अग्रतश्चतुरो वेदाः पृष्ठतः सशरं धनुः ।
इदं ब्राह्ममिंद क्षात्रं शापादपि शरादपि ।।

# चित्तपावन मित्र



वर्ष ४२ वे

अंक ९ वा

१० सप्टेंबर २०२१

किंमत १ रूपया



"श्री गणेश चतुर्थीच्या हार्दिक शुभेच्छा !"

॥ श्री परशुराम नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, नाशिक ॥

# श्री परशुराम नागरी सहकारी पतसंस्था मर्या. नाशिक

## वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

**श्री परशुराम नागरी सह. पतसंस्था मर्या. नाशिक** या संस्थेच्या मान्यवर सभासद बंधू-भगिनींना कळविण्यात येते की, **सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षाची २७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार, दि. १८/०९/२०२१ रोजी, सकाळी ११ वाजता, काका गद्रे मंगल कार्यालय, गोळे कॉलनी, नाशिक** येथे संस्थेचे **अध्यक्ष श्री. सुधीर दामले** यांच्या अध्यक्षतेखाली अदर ऑडिओ व्हिज्युअल मिन्स (OAVM) पद्धतीने बोलविण्यात आली असून त्यात खालील विषयांवर विचारविनिमय करून निर्णय घेण्यात येणार आहेत. तरी कृपया आपण वेळेवर ऑनलाईन उपस्थित रहावे ही विनंती.

**❊ सभेपुढील विषय ❊**

१) दि. १६/०३/२०२१ रोजी झालेल्या वार्षिक सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२) दि. ३१/०३/२०२१ अखेर संपलेल्या वर्षाचा अहवाल, ताळेबंद व नफातोटा पत्रक वाचून मंजूर करणे.
३) संचालक मंडळाने शिफारस केल्याप्रमाणे नफा वाटणीस मंजुरी देणे.
४) सन २०२०-२०२१ च्या अंदाज पत्रकापेक्षा कमी-अधिक झालेल्या खर्चाची नोंद घेऊन जादा झालेल्या खर्चास मंजुरी देणे व सन २०२१-२२ या वर्षाकरिता संचालक मंडळाने शिफारस केलेल्य अंदाजपत्रकास मंजुरी देणे.
५) सन २०२०-२०२१ या वर्षाच्या सहकारी तपासणी अहवालाची वाचून नोंद घेणे.
६) थकबाकीदार सभासदांची कर्जवसुली करण्याबाबत विचार करून निर्णय घेणे.
७) सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षासाठी संस्थेच्या हिशोब तपासणीसाठी लेखा परीक्षकाची नेमणूक करण्याबाबत.
८) वसूल होत नसलेली जुनी येणी कर्जे निर्लेखित करण्याबाबत.
९) मागील वार्षिक सर्व साधारण सभेस अनुपस्थित सभासदांची अनुपस्थिती क्षमापीत करण्याबाबत.
१०) मा. अध्यक्षांच्या पूर्व परवानगीने आयत्या वेळी येणाऱ्या विषयांवर विचार करणे.

ता. ०१/०९/२०२१ संचालक मंडळाच्या आदेशानुसार

**ठिकाण : नाशिक**

**श्री. अभय खरे**
मानद सेक्रेटरी

---

**❊ सभासदांस नम्र निवेदन ❊**

**सूचना :**

१) कोरमअभावी सभा तहकूब झाल्यास सदरची सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने सुरू करण्यात येईल. अशा सभेस कोरमची आवश्यकता राहणार नाही.
२) संस्थेचा सन २०२०-२०२१ अखेरचा तपासणी अहवाल कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत संस्थेच्या प्रशासकिय कार्यालयात पहावयास मिळेल.
३) संस्थेच्या कामकाजाबाबत आपल्या काही सूचना असल्यास त्या लेखी स्वरुपात दि. १०/०९/२०२१ पावेतो संस्थेच्या प्रशासकिय कार्यालयात आणून द्याव्यात.
४) सभा झूम ॲप्लिकेशनवर ऑनलाईन घेण्यात येईल. संस्थेत नोंद असलेल्या मोबाईल क्रमांक आणि ईमेल वर लिंक पाठविण्यात येईल.
५) ज्या सभासदांनी आपला ईमेल आयडी किंवा मोबाईल क्रमांक संस्थेकडे नोंद केला नाही, त्यांनी संस्थेच्या कार्यालयात दि. १०/०९/२०२१ पावेतो कार्यालयीन वेळेत त्याची नोंद करून घ्यावी.

**फोन नं. ०२५३-२३१३७०९.**

# विशेष सर्वसाधारण सभेचा वृत्तांत

चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक संस्थेची विशेष सर्वसाधारण सभा नुकतीच शनिवार दिनांक २८ ऑगस्ट २०२१ रोजी, गद्रे मंगल कार्यालयात संपन्न झाली.

संस्थेचे अध्यक्ष श्री. विजय साने यांच्या अध्यक्षतेखाली सभेचे कामकाज अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात, खरे तर प्रश्नोत्तराच्या सरबत्तीने सर्वंकष चर्चेत संपन्न झाले, त्याचे कारणही तसेच होते. ते म्हणजे सर्वांच्या जिव्हाळ्याचे, नाशिकमधील समस्त ज्ञाती बांधवांसाठी अस्मितेचे प्रतिक असलेले कै. काकासाहेब गद्रे मंगल कार्यालय विक्रीचा प्रस्ताव. भावनिकदृष्ट्या अगदी कुणालाही कार्यालय विक्री करू नये असेच वाटत होते. कार्यकारी मंडळासह सर्वच सभासदांच्या ही याच भावना होत्या. गेली अनेक वर्षे गद्रे मंगल कार्यालय हे केवळ लग्न विधीसाठी मर्यादित नव्हते, तर समस्त नाशिककरांच्या कला, संस्कृती, राजकीय मांडणी, समाजोपयोगी सांस्कृतिक केंद्र होते. लग्नाच्या बाबतीत तर २-२, ३-३ पिढ्यांच्या लग्नाचे साक्षीदार तर होतेच, पण त्याचबरोबर ग्राहक पेठ, ग्राहक मंच या सारख्या उपक्रमाची मुहूर्तमेढ झाली ती याच गद्रे मंगल कार्यालयातून. सांस्कृतिक पटलावर अनेक दिग्गज गायकांच्या गाण्यांच्या मैफिली रंगल्या त्या याच गद्रे मंगलमध्ये. त्याच सोबत अनेक होतकरू, उदयोन्मुख कलाकारांसाठी हक्काचे ठिकाण होते. राजकीय पक्षांच्या बैठका, निवडणुकांची आखणी, मोर्चेबांधणी, दिग्गज नेत्यांची उठबस या कार्यालयाने पाहिली आहे. योगेश्वरी महिला गृहउद्योजिकांसाठी तर हे हक्काचे घर! एका बाजूला असे एव्हढे वैभव असले तरी...

काळ बदलला, गरजा, परिपेक्ष, संदर्भ बदलले, पूर्वीचे सोयीचे कालौघात गैरसोयीचे होऊ लागले. याचा अंदाज कार्यकारी मंडळ, विश्वस्त मंडळास दशकापूर्वीच आला होता त्याच सोबत शहरातील काही समाजधुरीणांनी देखील त्याबद्दल सूचनाही केली होती. कार्यकारी मंडळाने देखील त्या वेळेस भावनेला प्राधान्य देऊन आउटसोर्सिंगचे दोन एक अयशस्वी प्रयोग करून पाहिले. परंतु पुढे पुढे तर परिस्थिती फारच बदलली. नावात मंगल कार्यालय असे असले तरी गेल्या तीन चार वर्षात नावाला देखील एकही मंगल कार्य होऊ शकले नाही (कोविडच्या काळात नाही म्हणायला एक अपवाद तोही फक्त २०-२० लोकांच्या उपस्थितीत) व्यवस्थापनाचा खर्च, देखभाल, दुरुस्ती, कर आदी बाबींसाठी खर्चाची तोंडमिळवणी हळूहळू अवघड होत होती. पर्यायाने संस्थेच्या मूळ उद्दिष्टांसाठी कमी पडणारी निधीची कमतरता. मंगल कार्यालयाचे उत्पन्न हा पूर्वी संस्थेसाठी भक्कम आर्थिक स्त्रोत होता की जो गत दशकात हळूहळू क्षीण झाला. तेव्हा कार्यकारी मंडळाने आणखी एक प्रयोग करून पाहिला, तो म्हणजे पहिला मजला भाड्याने दिला व थोड्याफार प्रमाणात आर्थिक स्त्रोत पुनर्जिवीत केला. परंतु भविष्यात संस्थेस लागणारे आर्थिक पाठबळ पुरवण्याइतपत तेव्हढे पुरेसे नाही आणि इथूनही पुढे भविष्यात होणारे शहर रचनेतील बदल लक्षात घेता हीच ती योग्य वेळ आहे हे लक्षात आल्यावर व त्या संबंधीची सर्वंकष चर्चा विश्वस्त मंडळ, प्रतिष्ठित नागरिक, नामवंत सल्लागार आदींचे याबाबत मार्गदर्शन घेऊन कार्यालय विक्रीचा प्रस्ताव हाती घेतला.

एकूणच सभासदांना या निर्णयाची व्यवहारिकता लक्षात आल्यामुळे आणि कार्यकारी मंडळ व विश्वस्त मंडळाचा निर्णय पटल्यामुळे, सर्वांनी या निर्णयास मान्यता दिली. त्याच बरोबर अनेक सभासदांनी सुचविले की ज्या दार्तृत्व भावनेने कै. काकासाहेब गद्रे यांनी संस्थेस आपली वास्तू देणगी स्वरूपात दिली, त्यांच्या भावनेचा योग्य आदर राखला जावा, तसेच त्यांची स्मृती जपली जावी. त्यावर माहिती सांगताना मा. अध्यक्षांनी सांगितले की संस्थेने नेहमीच देणगीदारांच्या भावनेचा आदर राखला आहे आणि या वेळीही संस्थेच्या नव्या वास्तूला / मोठ्या कक्षाला काका गद्रे यांचेच नाव देण्यात येईल.

तत्पूर्वी, अध्यक्ष श्री. विजय साने यांनी संस्थेच्या दीर्घकालीन योजनांसंबंधीची माहिती सभासदांना दिली तसेच, कार्यवाह श्री. अभय खरे यांनीही सभासदांच्या प्रश्नांचे संदर्भासह आकडेवारीनिशी निरसन केले. याप्रसंगी झालेल्या चर्चेत नाशिक शहर नगर रचना विभागाचे माजी प्रमुख सर्वश्री मोहन रानडे, ज्येष्ठ सभासद व व्यावसायिक श्री. अरविंद वर्तक, माजी कोषाध्यक्ष रविंद्र (दादा) गोडबोले, गाडगीळ बंधू, रमेश मराठे, श्री. शिधये, संस्थेचे सनदी लेखापरीक्षक भालचंद्र कर्वे साहेब, विनायक जी रानडे, सौ. साने वहिनी, विवेक बापट, हेमंत रानडे, कार्यकारी मंडळाचे सर्वच पदाधिकारी आणि सदस्य व अनेक सभासद बंधू उपस्थित होते. उपस्थित सर्वच सभासदांनी सभेच्या कामकाजात नोंदवलेला सहभाग अत्यंत प्रेरक, उल्लेखनीय होता आणि पोषक वातावरणात सभेचे कामकाज झाल्याबद्दल कार्यवाह श्री. अभय खरे यांनी अध्यक्ष व उपस्थित सर्व मान्यवर सभासदांचे आभार मानले व सभेचे कामकाज संपले.

# श्री महालक्ष्मी पूजन

मंगळवार दि. १२ ऑक्टोबर २०२१ रोजी पुजेची अष्टमी आहे. गेल्या वर्षी आपण ऑनलाईन पद्धतीने देवीचा उत्सव साजरा केला. त्यामुळे बऱ्याच सभासद आणि पार परदेशातही लोकांना आपल्या महालक्ष्मीचे दर्शन घडले. खूप जणांनी संस्थेचे कौतुक केले घरबसल्या देवीचे दर्शन झाले म्हणून.

या वर्षी आपण ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने सकाळच्या पुजेचे नियोजन करीत आहोत. **मात्र संध्याकाळी फक्त ऑनलाईनच दर्शन मिळण्याची व्यवस्था करीत आहोत.**

ज्यांचे पुजेचे वर्ष आहे. त्यांच्यासाठी नियोजनाच्या दृष्टीने दोन्ही सोई करण्यात येत आहेत. ज्यांना संस्थेच्या काका गद्रे कार्यालयात येऊन पूजा करायची असेल त्यांनी आपली नावे ९ ऑक्टोबरपर्यंत शुल्क भरून नोंदणी करायची आहेत ज्यांची नोंदणी होईल फक्त त्यांनाच पुजेसाठी येता येईल. त्यांनी पूजा व भोजन शुल्क रु. २००/- भरून कार्यालयातून पावती घेऊन जावी. नाव नोंदणी करतांना आपला **मोबाईल नंबर** देणे आवश्यक आहे. पुजेसाठी आलेल्या मुलींनाच प्रसादाचा लाभ घेता येईल.

या वर्षी पुजेव्यतिरिक्त प्रसाद भोजन इतरांना असणार नाही याची नोंद घ्यावी.

ज्यांना ऑनलाईन पद्धतीने आपापल्या घरात बसून पूजा करायची आहे त्यांनीही आपली नावे संस्थेच्या कार्यालयात नोंद करणे आवश्यक आहे. आपले नाव व फोन नंबर दिल्यास पुजेची लिंक पाठवणे सोयीचे होईल.

ज्या कोणाला देवीच्या उत्सवासाठी देणगी द्यायची असेल त्यांनी ऑनलाईन अथवा संस्थेच्या कार्यालयात देणगी जमा करावी. ऑनलाईनसाठी बँकेचे डिटेल्स खालीलप्रमाणे:-

नाव - **चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक.**

बँक नाव - **कॉसमॉस को-ऑ. बँक, रविवार कारंजा शाखा, नाशिक.**

A/c No. : **90710010851**

RTGS / NEFT IFSC : **COSB0000907**

**पुजेची वेळ - सकाळी १०.३० वा.**

**पुजार्थिनींनी आणावयाचे साहित्य:-**

हळद-कुंकू, गुलाल, बुक्का, अष्टगंध, ताम्हण, पळी, भांडे, दोन तुपाची निरांजने-तूप निरांजनात घालण्यासाठी वातीसह, उगाळलेले चंदनाचे गंध, कापूर, उदबत्ती, काडेपेटी, विड्याची पाने-१०, सुपाऱ्या-१०, खारीक, बदाम प्रत्येकी पाच, पाच प्रकारची फळे जी आपण खाऊ शकतो अशी असावीत, सुटे पैसे, नारळ, फुले, पत्री, दुर्वाच्या दोन जुड्या, गूळ खोबरे, जानवी-२, कापसाची वस्त्रे-२ अक्षता, अत्तर, काजळ डबी. देवीच्या नैवेद्यासाठी दूध+साखर अथवा दुसरे काही.

ज्यांचे पाचवे उद्यापनाचे वर्ष असेल त्यांनी वायनदानासाठी कोरे सूप, १ खण, नारळ, आरसा, कंगवा, करंडा, बांगड्या, गळसरी, ओटीचे साहित्य (तांदूळ, सुपारी, नारळ) विडा सुपारी, दक्षिणा आणावी.

संस्थेच्या कार्यालयात येऊन पूजा करणाऱ्यांना खडे, रेशमाचे तातू, दुर्वांचा तातू, पंचामृत संस्थेतून मिळेल.

ज्या मुली आपापल्या घरीच पूजा करणार आहेत त्यांनी सगळ्या तयारीबरोबर तातू, खडे, पंचामृत तयार ठेवावे.

पुजेसाठी लागणारी पत्री-आघाडा, दुर्वा, धोत्रा, बेल, तुळस, चाफा, शेवंती, केवडा, आंबा, बोर, प्राजक्त, बकुळ, मालती, अशोक, हादगा, माका, शमी, रुई, कण्हेर इ. बाजारात मिळणारी पत्री आणू नये. जी आपल्यास माहिती आहेत, जेव्हढी मिळतील तेव्हढीच आणावीत. पुजेच्या वेळी काळी वस्त्रे परिधान करू नयेत. हातात काचेच्या बांगड्या असाव्यात. आपले पुजेचे साहित्य नीटनेटके व स्वच्छ असावे. ५ फळांऐवजी एक आणले तरी चालेल पण ते चांगले असावे. आपण देवीची पूजा चांगल्या भावनेने करायची आहे.

संध्याकाळी होणाऱ्या पुजेसाठी, साडी, मुखवट्याचे तांदूळ, प्रसाद, फुलांचा साज देवीचा इ. साठी देणगी देऊ इच्छिणाऱ्यांनी संस्थेत आपली रक्कम भरावी. त्याच देणगीतून अष्टमी उत्सवासाठी विनियोग केला जाईल.

**✲ संपर्क ✲**

**सौ. मंगला जोगळेकर**
मो. : ९९२३००३३५४

**सौ. मैथिली गोखले**
मो. : ९८२२५६४०२४

# कोरोना पीडा टळो

कोरोना निर्बंधाने सारे जन विचलित झाले,
डोळ्यापुढती काजवे की हो चमकले ।।१।।

लगेच मनी विचार आला, यात किती फायदे,
एक प्रमुख फायदा, सारे कुटुंबीय एकत्रित आले ।।२।।

मोबाईल, टी.व्ही, स्वकर्मांकरिता कुटुंबीय दुरावलेले,
त्यात आधी संवाद कमी होते, ते आता होऊ लागले ।।३।।

इतके दिवस दूरच्यांशी संवाद होत होते,
त्यावेळी कुटुंबांत जुजबीच संवाद चालत होते ।।४।।

वाहने बंद आहेत म्हणून प्रदूषण नाही,
जमावबंदी मुळे रस्त्यांवर गर्दी नाही ।।५।।

आरोग्यासाठी सगळीकडे स्वच्छता हवी,
म्हणून केरकचरा कुठेही फेकण्यास केली बंदी ।।६।।

कर्णकर्कश आवाज येत नाहीत सध्या,
म्हणून शांतता अनुभवता येते ना आता ।।७।।


समाज संपर्क नाही म्हणून मन खट्टू होते.
पण आपल्याच भल्यासाठी हे सर्व योग्य ठरते ।।८।।

कोरोना हे महासंकट सर्व जगतापुढे आहे ठाकले,
परास्त करणे त्याला हे प्रत्येकाचे कर्तव्य ठरते ।।९।।

भेदभाव सारे विसरून कोरोनास जगतापार हाकला,
मगच आनंदाने घेता येईल सर्वांना श्वास मोकळा ।।१०।।


**– सौ. वसुमती म. साठे,**
**'मनोज्ञ'** बंगला, ५–अर्पणा गृह समुह, टाकळी रोड,
द्वारका परिसर, नाशिक – ४२२ ०११.
फोन – (०२५३) २५९५९६२.

# ❊ भावपूर्ण श्रद्धांजली ❊



संस्थेचे आजीव सभासद **श्री. अरविंद बर्वे** यांचे १६/०८/२१ रोजी वयाच्या ८१ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. ३२ वर्षाच्या सेवेनंतर ते देना बँकेतून निवृत्त झाले होते. एक कर्तव्यदक्ष आणि शिस्तप्रिय ज्येष्ठ अधिकारी अशी त्यांची ख्याती होती. देना बँकेच्या प्रशिक्षण कॉलेजमध्येही त्यांनी फॅकल्टी मेंबर म्हणून काम केले होते. व्यायाम, योगासने, पायी फिरणे याची त्यांना विशेष आवड होती. सतत काही तरी करत राहण्याचा त्यांचा ध्यास असायचा. निवृत्तीनंतरही त्यांनी तीन वर्षे शास्त्रोक्त पद्धतीने शिकून, ज्योतिष्याचा अभ्यासक्रम पूर्ण केला होता. महाराष्ट्र ज्योतिष्य परिषदेच्या कामात त्यांचा सक्रिय सहभाग असायचा. संस्थेच्या सर्वच कार्यक्रम, सभांना ते आवर्जून उपस्थित रहात. पतपेढी, संस्थेविषयी त्यांना विशेष आस्था होती. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

संस्थेतर्फे श्री बर्वे यांना भावपूर्ण श्रद्धांजली.




आपल्या संस्थेचे ज्येष्ठ सभासद व पेठे विद्यालयातील सेवानिवृत्त क्रिडा शिक्षक **वि. अ. साठे** यांचे १४/०८/२१ रोजी वयाच्या ८७ व्या वर्षी दु:खद निधन झाले.

एक उत्तम क्रिडा शिक्षक म्हणून त्यांची ओळख होती. ते उत्कृष्ट खो–खो पटू होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा डॉ. अतुल साठे, सून डॉ. आनंदी, मुलगी अंजली, जावई व नातवंडे असा परिवार आहे.

साठे कुटुंबियांच्या दु:खात संस्था सहभागी आहे.

संस्थेतर्फे त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.



नाशिक येथील रहिवासी व बँक ऑफ महाराष्ट्रचे सेवानिवृत्त कर्मचारी **जयंत करंदीकर** यांचे वयाच्या ७२ व्या वर्षी दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. संस्थेतर्फे त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

# उद्योजक मंच - सध्या आम्ही काय करतो आहे...

**उद्योजक मंचची** स्थापना साधारण २००८-२००९ च्या सुमारास चित्तपावन ब्राह्मण संघाच्या अमृत महोत्सवाच्या वर्षात झाली. परंतु खऱ्या अर्थाने उद्योजक मंचाचे कामकाज वाढीस लागले, विस्तार झाला तो २०११ च्या दशकात, २०११ ते २020 या कालखंडात. उद्योजक मंच हा केवळ नाशिक उद्योजकांपुरता मर्यादित न राहता, नाशिकच्या बाहेरही पोहोचला. अगदी महाराष्ट्रात सर्वदूर नव्हे तर साता समुद्रापलिकडे देखील पोहोचला. **१५ ऑगस्ट** हा मंचाचा वर्धापन दिन म्हणजे नाशिक तसेच बाहेरील उद्योजकांसाठी पर्वणीच. भारताच्या सर्व भागातून अगदी विदेशातूनही उद्योजक या कुंभमेळासारख्या उद्योजकांच्या मेळाव्यास आवर्जून उपस्थित राहत आणि त्याच माध्यमातून अनेक दिग्गज, ख्यातनाम उद्योजक संघास जोडले गेले ते कायमचेच. हा खरं तर एक मैलाचा टप्पाच म्हणावा लागेल. या शिवायही लहान, मोठ्या स्थानिक उद्योजकांना उद्योजक मंचचा खूपच फायदा झाला. मग तो व्यवसाय विस्ताररूपाने असेल, नेटवर्किंगचा असेल, मान्यवर प्रथितयश उद्योजकांचे मार्गदर्शन असेल, सपोर्ट असेल, रेफरन्सद्वारे असेल अशा एक ना अनेक बाबतीत उद्योजक मंचची यशस्विता सांगता येईल.

गत वर्ष - दोन वर्षात मात्र कामकाजात थोडंसं शैथिल्य आलं. अर्थात त्याचे कारणही तसेच होते आणि ते म्हणजे उद्योजक मंचाचे अध्वर्यू आपल्या सगळ्याचे मार्गदर्शक असे मधुकरकाका बापट आणि दुसरे आधारस्तंभ श्री. वसंत जी दातार यांचे आपल्यामधून अचानक निघून जाणे. दोहोंच्या नुसत्या आठवणीने अनेकांचे कंठ दाटून येतात. डोळे पाणावतात.

यातून मार्ग काढत, सध्याच्या कोरोनाच्या पार्श्वभूमीवर येत्या नव्या दशकासाठी नव्या विचाराने, नव्या उभारीने काय करता येईल याच उद्देशाने पुन्हा एकदा १५ ऑगस्टचे औचित्य साधत, उद्योजक मंचाचे, अनौपचारिक गेट - टुगेदर झाले आणि त्यासाठी पुढाकार घेतला तो प्रभंजन पटवर्धन आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी.

यावेळी प्राप्त परिस्थितीवरील चर्चेच्या ओघात अनेक सामाजिक विषयांवरदेखील चर्चा झाली. गेल्या दीड वर्षापासून चालू असलेल्या कोविड महामारीने अनेक कुटुंबातले एक किंवा दोन्ही पालक हिरावून नेले आहेत. अशा परिस्थितीत त्या कुटुंबियांना केवळ आर्थिकच नव्हे तर मानसिक बळ, सामाजिक आधार याचीही गरज असते. वेळप्रसंगी कायदेविषयक, न्यायालयीन मदतही गरजेची असते. अशा काही केसेसदेखील नुकत्याच समोर आलेल्या असून उद्योजक मंचाच्या माध्यमातून आपण कशी आणि कायद मदत करू शकतो याची चर्चा यावेळी ज्येष्ठ उद्योजक श्री. देवेंद्र बापट यांनी घडवून आणली. उपस्थित सर्वच उद्योजकांनी या प्रकारच्या मदतीला लगेच तयारी दर्शवली. ॲड. जयदीप वैशंपायन यांनी देखील अशा केसेसमध्ये न्यायालयीन सल्ल्याची तयारी दाखवली.

औरंगाबाद येथे उद्योजकांवर, व्यवस्थापकांवर झालेल्या हल्ल्याबद्दल सर्वांनी तीव्र निषेध व्यक्त केला. समाजाला बळ द्यायचं असो किंवा समाजकंटक प्रवृत्तींचा बिमोड करायचा असो संघटनेची शक्तीच महत्त्वाची असते असेही मत श्री. देवेंद्र बापट यांनी मांडले. म्हणूनच चित्तपावन उद्योजक मंचाच्या माध्यमातून उद्योजकांनी पुन्हा नव्या जोमाने आणि नव्या दमाने महिन्यातून एकदा एकत्र यावे असा निश्चय केला व अशा विषयांवर चर्चा करावी असा प्रस्ताव सर्वांनी मान्य केला.

त्यानंतर उद्योजक मंचाच्या आठवणींना उजाळा देत काही सदस्यांनी आपले अनुभव मांडले. उद्योजक मंचामुळे जोडल्या गेलेल्या अनेक ज्येष्ठ श्रेष्ठ मान्यवरांबरोबर आज छान व्यावसायिक नाते जोडले गेले आहे तर काही आपल्यातल्या अनेकांना मार्गदर्शक ठरले आहेत. ज्यांची भेट घेण्यासाठी, बराच फॉलोअप करावा लागतो, अशा अतिशय व्यस्त वेळापत्रक असलेल्या श्री. विवेक परांजपे, श्री. गिरीश टिळक, श्री. राम भोगले, श्री. गिरीश चितळे, श्री. गद्रे ही मंडळी, केवळ उद्योजक मंचाच्या माध्यमातून जोडली गेल्याने, सर्वतोपरी मदत करीत आहेत हे उद्योजक मंचाचे यश पुन्हा एकदा अधोरेखित झालं. हा Networking चा सर्वात मोठा फायदा..

उद्योजक मंच किंवा कुठलीही संघटना ही व्यक्ती विकासाची सुवर्णसंधीच असते. इथेच नेतृत्वाच्या संधी निर्माण होतात आणि नेतृत्व बहरत जातं. याचा अनुभव अनेकांनी उद्योग मंचाच्या आजवरच्या वाटचालीत घेतलेला आहे. ह्या प्रसंगी, उद्योग मंचाचे आधारस्तंभ कै. मधुकर बापट व कै. वसंत दातार यांची उणीव यावेळी ही प्रकर्षाने जाणवली.

चर्चेदरम्यान आपल्या ज्ञातीतील उल्लेखनीय कामगिरी करणारे उद्योग आणि उद्योजक यांचीही चर्चा झाली. यशस्वी उद्योजकांच्या अनुभवातून सर्वांनाच प्रेरणा आणि मार्गदर्शन मिळावं या उद्देशाने दर महिन्याला यातल्या काही उद्योग वा उद्योजकांची माहिती चित्तपावन मित्र अथवा Online Meeting द्वारे सर्वांपर्यंत पोहोचवावी अशी संकल्पना श्री. विनायक रानडे यांनी मांडली.

गद्रे मंगल कार्यालयाच्या उभारणी बाबतीतील काही आठवणी श्री. विवेक बापट आणि श्री. हेरंब घारपुरे यांनी सांगितल्या.



त्यानंतर लॉजिक सिस्टीम्सचे श्री. चेतन भट यांनी त्यांचे मनाली–खार्दुंगला सायकलिंग एक्सपेडिशनचे अनुभव सांगितले. ६००० ते १८००० फुटाचा हा साहसी प्रवास ११ दिवसाचा हा प्रवास शारीरिक, मानसिक कसोटी बघणारा होता. प्रवासाची तयारी, खाण्यापिण्याची, राहण्याची व्यवस्था या बरोबरच जुन्या नाशकातल्या गल्ल्यांमध्ये केलेला उंच चढाईचा सराव निश्चित महत्वाचा होता असंही त्यांनी आवर्जून सांगितलं.

सुग्रास स्नेहभोजनाने बैठकीची सांगता झाली व उद्योजकांनी एकमेकांचा निरोप घेतला तो पुन्हा भेटण्याच्या निश्चयाने, निर्धाराने.

**शब्दांकन – धनलक्ष्मी पटवर्धन**

## ✻ अभिनंदन ✻



चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक या संस्थेचे ज्येष्ठ सदस्य श्री श्रीकांत बापट यांची नात व सौ. बागेश्री समीर जोशी यांची कन्या **कु. पूर्वा समीर जोशी,** बी. वाय. के. महाविद्यालयातून, नाशिक इ. १२ वी बोर्ड परीक्षेत ८६% गुणाने उत्तीर्ण झाली. तिला पुढील शिक्षणासाठी एम्.बी.ए. फायनान्स – बँकिंग क्षेत्रासाठी चित्तपावन मित्र – स्नेही परिवारातर्फे ''हार्दिक शुभेच्छा'' !



अखिल भारतीय किर्तन संस्था मुंबई यांच्यातर्फे सन २०२०–२०२१ या सालामध्ये झालेल्या किर्तन तृतीय वर्ष अंतिम परिक्षेत यशस्वी झाल्याबद्दल **ह. भ. प. श्री. प्रदीप पद्माकर लवाटे,** यांना किर्तन विशारद ही पदवी देण्यात आली. ते आपल्या संस्थेचे सभासद असून पुढील वाटचालीसाठी संस्थेतर्फे ''हार्दिक शुभेच्छा'' !

निवासी, व्यापारी, औद्योगिक संकुल बांधकाम,
प्लॉट डेव्हलपमेंट यातील विश्वसनीय नाव

# मिहिर कन्स्ट्रक्शन

**सिव्हिल कॉन्ट्रॅक्टर**

**ऑफिस :** २, प्रसाद रेसिडेन्सी, माणेकशा नगर,
रत्नपारखी हॉस्पिटलजवळ, द्वारका, नाशिक.
फोन : २५९०७५४

**सी. व्ही. रानडे,** बी.ई. (सिव्हिल)

**मोबाईल :** ०९४२२२४६८७८
**ईमेल :** cvranade@gmail.com

# काळे*s

**रूचकर स्वयंपाक तुमचा...मसाला मात्र आमचा**

संपर्क :– ९७६६९९११० ओंकार काळे / ७०२०६२७६२९ सरोज काळे

● चहा मसाला ● चाट मसाला ● बिर्याणी मसाला
● पावभाजी मसाला ● गोडा मसाला ● किचनकिंग मसाला
● पाणी पुरी मसाला ● सांबार मसाला ● छोले मसाला
● शाही पनीर मसाला ● मालवणी मसाला
● काळा मसाला ● दाबेली मसाला ● गरम मसाला
● थालीपीठ भाजणी ● उपवास थालीपीठ भाजणी

**✻ आमची वैशिष्ट्ये ✻**

● सर्व मसाले घरच्या गिरणीवर दळले जातात.
● कुठलाही रंग अथवा प्रिझर्वेटिव्ह घातले जात नाही.
● यामुळे मसाल्याचा रंग आणि नैसर्गिक सुगंध तसाच टिकून राहतो.
● १००% नैसर्गिक
● १००% केमिकल विरहित
● प्रत्येक वेळेस खडे मसाले चाळून व निवडून घेतले जातात.
● रुचकर आणि चवदार

**संतुष्ट ग्राहक हाच आमच परिवार...
या आमच्या परिवारात सामील व्हा.**




चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक या संस्थेच्या मालकीचा हा अंक संपादक व प्रकाशक श्री.विजय राजाराम साने, यांनी मीरा एंटरप्राईजेस, २, जयश्री अपार्टमेंट, ठाकरे बंगला, गंगापूर रोड, नाशिक- २ येथे छापून काका गद्रे मंगल कार्यालय, गोळे कॉलनी, नाशिक-४२२००२ येथे प्रसिद्ध केला.

**गद्रे मंगल कार्यालय, फोन : ०२५३ - २५७६२४१**

प्रति, ______________________

______________________

______________________

**संस्थेची वेबसाईट :-**

- Website : www.nasikchitpavan.org
- Email ID : nasikchitpavan@gmail.com
- http://twitter.com/nasikchitpavan
- http://facebook.com/nasikchitpavan
- http://youtube.com/user/nasikchitpavan

या मासिकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. लेखातील सर्व मते व विचार हे सर्वस्वी त्या त्या लेखकांचे आहेत. जाहिरातदारांनी जाहिरातीत केलेल्या निवेदनाला संपादक जबाबदार नाहीत. ग्राहकांनी जाहिरातीतील उत्पादनांची व नमूद केलेल्या बाबींची प्रत्यक्ष पडताळणी करून पाहावी. 'चित्तपावन मित्र' च्या मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादकांचा या गोष्टींशी काहीही संबंध नाही.

RNI - Regd No. 35688 / 20-11-1979
सवलतीच्या दराची तिकिटे लाऊन पोस्टाने पाठविण्याचा परवाना NSK / RNP-231/2021-2023
सदर अंक दर महिन्याच्या १० तारखेस प्रसिद्ध होऊन नाशिक G.P.O मधून वितरित केला जातो.